**MHLC060000132026**

दाखल दिनांक: १६/०१/२०२६
नोंदणी दिनांक: १९/०१/२०२६
निकाल दिनांक: ०३/०६/२०२६
कालावधी: ४ महिने ८ दिवस
सीएनआरनं: एमएचएलसी०६००००१३२०२६

## नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम, रायगड-अलिबाग
## श्री. गौ. स. हांगे, न्यायाधीश यांचेसमोर

अर्ज (उपदान) क. ६/२०२६

श्री. मंगेश रामचंद्र पाटील
वय : ५४ वर्षे, धंदा : निवृत्त
रा. बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड. .. अर्जदार

विरुध्द

१. उपमहाव्यवस्थापक,
आर.सी.एफ. थळ एम्प्लॉईज को. ऑप.
कंन्झ्युमर सोसायटी लि.,
सरखेल कान्होजी आंग्रे नगर,
कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड.

२. अध्यक्ष,
आर.सी.एफ. थळ एम्प्लॉईज को. ऑप.
कंन्झ्युमर सोसायटी लि.,
सरखेल कान्होजी आंग्रे नगर, .. सामनेवाला
कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड.

अर्जदारातर्फे :- वकील, श्री. आर. के. पाटील.
सामनेवालातर्फे :- वकील, श्री. के. डी. पाटील.

:: न्यायनिर्णय ::
(दि. ०३/०६/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने या न्यायालयात उपदानाची रक्कम मिळण्यासाठी उपदान प्रदान कायदा १९७२ कलम ७ नुसार दाखल केला आहे.

२. अर्जदार हा सामनेवाला यांच्या सोसायटीमध्ये दि १४/०१/१९९३ पासून विक्रेत्याच्या पदावर कार्यरत होते. ते ऑगस्ट २०२४ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. ते सामनेवाला यांच्या सोसायटीमध्ये कायमस्वरुपी कर्मचारी होते. त्यांनी सामनेवाला यांच्याकडे ३१ वर्षे यशस्वी सेवा दिलेली आहे. सामनेवाला क १ उपमहाव्यवस्थापक व सामनेवाला क २ हे अध्यक्ष असून ते दोघे व संचालक मंडळ हे सोसायटीचे कामकाज पाहतात. सदरची सोसायटी ही महाराष्ट को. ऑप. सोसायटी अंतर्गत नोंदणीकृत आहे. अर्जदार ऑगस्ट २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर सामनेवाला यांच्याकडून ते अनुदानाची रक्कम मिळण्यास पात्र आहेत. त्यांनी दिलेली सेवा ही निष्कलंक असून त्यांना सामनेवाल्यांकडून उपदानाची रक्कम मिळण्याचा अधिकार आहे.

३. अर्जदाराने दि १८/०३/२०२४ रोजी सामनेवाला यांच्याकडे उपदानाची रक्कम मागणीकरीता अर्ज दाखल केला होता. परंतू, त्यांनी तो विचारात घेतला नाही. सबब, अर्जदाराने दि २९/०५/२०२५ रोजी वकिलांमार्फत सामनेवाला यांना नोटीस पाठवून कायदेशीर अनुदानाच्या रकमेची मागणी केली होती परंतू सामनेवाला यांनी सदरील रक्कम अर्जदारास अदा केलेली नाही. तसेच अर्जदाराच्या नोटीसीला कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्जदाराला प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल करणे भाग पडले आहे.

४. अर्जदार यांचे शेवटचे वेतन दर महा रक्कम रु.१४,२८९/- असे होते त्यामुळे उपदान रक्कम कायदा नुसार अर्जदार यास त्यांची ३१ वर्षे सेवा धरुन एकूण रक्कम रु.२,५५,७१५/- इतकी रक्कम अनुदान म्हणून मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्जदार यांना ती रक्कम प्राप्त व्हावी या उद्देशाने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यांनी उपदानाच्या रकमेवरती १५ टक्के व्याज मिळावे अशी विनंती केलेली आहे.

५. सामनेवाला तर्फे निशाणी क. सी-२ कडे त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सामनेवाला सोसायटीची अर्जदार यास सेवा उपदान रक्कमेची प्रतिपुर्ती करण्याची कायदेशीर जबाबदारी असल्याचे मान्य केले आहे. तसेच सामनेवाला यांनी अर्जदारास कोणतेही सेवा उपदान नाकारलेले नाही असे कथन केले आहे. त्यांनी उपदान रक्कम अदा करण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्याचे कथन केले आहे तसेच सामनेवाला सोसायटीकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर अर्जदारास सेवा उपदानाची रक्कम अदा करण्यात येईल असे कथन केले आहे.

६. अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनांचे व अभिलेखावर दाखल केलेल्या इतर कागदत्रांचे अवलोकन करुन निशाणी क ओ-३ कडे मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यावरील निर्णय मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अनु. क. | मुद्दे | निर्णय |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र आहे का? | होय |
| २ | अर्जदार उपदान रकमेवर १५ टक्के व्याजदर मिळण्यास पात्र आहे का? | १० टक्के |
| ३ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u> :-

७. अर्जदाराने अर्जासोबत निशाणी क यू-६ कडे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे तसेच, याकामी खालील कागदोपत्री पुराव्यांचा आधार घेतला आहे. सदरील कागदपत्रे निशाणी क यू-५ कडे दाखल केलेली आहेत.

१. दि २९/०५/२०२४ रोजी वकिलांमार्फत सामनेवाला यास पाठविलेल्या नोटीसीची प्रत.

२. दि १८/०३/२०२४ रोजी सहाय्यक निबंधक अलिबाग रायगड यांना दिलेल्या अर्जाची प्रत.

३. अर्जदार यांच्या पगाराच्या तपशीलाची प्रत.

४. अर्जदार नोकरी करत असलेल्या ठिकाणाचे ओळखपत्र.

५. अर्जदार यांच्या आधारकार्डाची प्रत.

८. सामनेवालातर्फे कोणताही तोंडी व कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही.

मुद्दा क १ व २:-

९. अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये असे कथन कले आहे की, ते सामनेवाला यांच्याकडे दि १४/०१/१९९३ रोजी पासून विक्रेत्याच्या पदावर कार्यरत होते. ते ऑगस्ट २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच त्यांनी एकूण ३१ वर्षे सेवा केलेली आहे. त्यांच्या कथनांनुसार सामनेवाला यांनी त्यांना विनंती करुन देखील त्यांनी उपदानाची रक्कम अदा केलेली नाही. अर्जदार यांनी दिलेल्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रावर सामनेवाला यांनी कोणताही उलटतपास नोंदविला नाही. सामनेवाला यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार त्यांच्याकडे कामाला होता याबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही. तसेच त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव सामनेवाला अर्जदारास उपदानाची रक्कम देउ शकलेले नाही असे म्हटले आहे.

१०. अर्जदार सामनेवाला संस्थेमध्ये दि. १४/०१/१९९३ पासून ऑगस्ट २०२४ पर्यंत नोकरी करत होते ही बाब सामनेवाला यांनी कोठेही अमान्य केलेली नाही. अर्जदार यांनी दाखल केलेल्या पगार पत्रकाचे अवलोकन केले असता

अर्जदार यांना शेवटच्या जानेवारी २०२४ महिन्यातील मुळ वेतन रु.४,८१०/- अधिक महागाई भत्ता रु.९,४८८/- असे एकूण १४,२९८/- रुपये वेतन असल्याचे दिसून येते. सामनेवाला यांनी अर्जदाराचे वेतन कोठेही नाकारलेले नाही. अर्जदार यांनी एकूण ३१ वर्षे सेवा केलेली आहे. त्यामुळे उपदान प्रदान कायद्याप्रमाणे एकूण वेतन रु.१४,२९८/- यास २६ ने भागून पाहिले असता येणारी रक्कम ही ५४९.९२ रुपये अशी येते त्यास पुन्हा १५ ने गुणले असता येणारी रक्कम रु.८,२४८.८४/- अशी असून त्यास पुन्हा एकूण सेवा काळ ३१ ने गुणले असता येणारी रक्कम ही २,५५,७१५/- रुपये अशी येते.

११. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात उपदान रक्कमेवर १५ टकके व्याजाची मागणी केलेली आहे. उपदान प्रदान कायदा १९७२ चे कलम ७ (3–अ) नुसार देय असलेली उपदानाची रक्कम अदा न केल्यास केंद्र शासनाने अधिसुचीत केलेल्या व्याजदरामुळे सरळ व्याज मंजुर करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने दि ०१/१०/१९८७ रोजी कलम ७ (3–अ) अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेनुसार सरळ व्याजाचा दर १० टक्के ठरविण्यात आलेला आहे. त्यानुसार अर्जदाराला सेवानिवृत्तीच्या तारखेपासून रक्कम अदा करेपर्यंत १० टक्के सरळ व्याज मंजूर करणे योग्य होईल. म्हणून वरील सर्व बाबी व कारणमिमांसेच्या अनुषंगाने मी मुद्दा क १ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: आ दे श ::

१. अर्जदार यांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांनी अर्जदाराला उपदानाची रक्कम रु.२,५५,७१५/-(अक्षरी दोन लाख पंचावन्न हजार सातशेपंधरा रुपये मात्र) दि. ०१/०९/२०२४ पासून रक्कम अदा करेपर्यंत १० टक्के सरळ व्याजाने अदा करावी.

३. सामनेवाला यांनी वर नमुद उपदानाची रक्कम एका महिन्याच्या आत अदा करावी. त्यानुसार सामनेवाला यांना नमुना आर ची नोटीस काढण्यात यावी.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.

HANGE GAURAV SADASHIV
Digitally signed by HANGE GAURAV SADASHIV
Date: 2026.06.03 17:17:51 +0530

( गौ. स. हांगे)
नियंत्रण अधिकारी तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, रायगड-अलिबाग

ठिकाण :- अलिबाग
दि. ०३/०६/२०२६

टंकलीखीत केले - ०३/०६/२०२६
पिठासीन अधिकारी सही - ०३/०६/२०२६